महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

ई-मेल:- gmcamravati@gmail.com

जा.क्र.शावैमअ/ आस्था१-२/ सह. प्राध्या /थेट मुलाखत/जाहिरात/2751 /२५ दिनांक14०५.२०२५

## थेट मुलाखत (Walk-In-Interview)

## जाहिरात

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील सहाय्यक प्राध्यापक यांचे पदे कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात एकत्रीत मानधनावर ३६४ दिवसाकरीता भरण्याबाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. पदनि-२०२३/प्र.क्र.१७७/२३/वैसेवा-२ दिनांक ०६ मार्च, २०२४.

२. शासन निर्णय क्रमांक: एलईसी-१४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३ दि. १८ जुलै, २०२४.

३. शासन निर्णय क्र. वेतनी-२०१९/प.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, दिनांक ३१ डिसेंबर, २०२०.

४. The Gazette of India, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली अधिसुचना, दि.१४.०२.२०२२.

उपरोक्त विषयानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती या संस्थेतील खालील नमुद विषयातील सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील पदे शासनातर्फे विहीत मार्गाने भरेपर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उपलब्ध होईपर्यंत किंवा संचालनालयातर्फे बंधपत्रीत उमेदवार मिळेपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत स्थानिक निवड मंडळा मार्फत ३६४ दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रचलीत संदर्भ क्र.२ च्या शासन नियमानुसार व संदर्भ क्र.३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकत्रित मानधनावर भरण्याकरीता ही जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

### पदाचे नाव :- सहाय्यक प्राध्यापक (थेट मुलाखत कंत्राटी पध्दतीने)

| अ.क्र. | विभागाचे नाव | रिक्त पदे | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता | ठोक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | शरिररचनाशास्त्र (Anatomy) | ०१ | खुला संवर्ग- ४० वर्षा पर्यंत<br>मागास संवर्ग- ४५ वर्षा पर्यंत | राष्ट्रीय आर्युविज्ञान आयोगाच्या मानकानुसार (As per Latest NMC Norms) | नियमानुसार (एकत्रीत मानधनावर) |
| २ | शरिरक्रियाशास्त्र (Physiology) | ०१ | | | |
| ३ | जिवरसायनशास्त्र (Biochemistry) | ०१ | | | |
| ४ | औषधशास्त्र (Pharmacology) | ०२ | | | |
| ५ | सुक्ष्मजिवशास्त्र (Microbiology) | ०१ | | | |
| ६ | जनऔषधवैद्यकशास्त्र (Community Medicine) | ०१ | | | |
| ७ | न्यायवैद्यकशास्त्र (F.M.T) | ०१ | | | |
| ८ | औषधवैद्यकशास्त्र (Gen Medicine) | ०३ | | | |
| ९ | शल्यचिकित्साशास्त्र (Gen Surgery) | ०१ | | | |
| १० | बधिरीकरणशास्त्र (Anesthesia) | ०१ | | | |
| ११ | मनोविकृतीशास्त्र (Psychiatry) | ०१ | | | |
| १२ | क्षय व उररोग (T.B. Chest) | ०१ | | | |
| १३ | आपत्कालीनऔषधीशास्त्र (EmergencyMedicine) | ०१ | | | |
| १४ | प्रसुती व स्त्रीरोगशास्त्र (OBGY) | ०१ | | | |
| | एकुण | १७ | | | |

१.सदर जाहिरातीचा तपशिल व अर्जाचा नमुना या संस्थेच्या www.gmcamravati.org व www.med-edu.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

२. अर्ज उपलब्ध होण्याची तारीख :- दि. १४/०५/२०२५

३. अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक :- दि. १७/०५/२०२५ (सायंकाळी ५.०० पर्यंत) कार्यालयीन वेळेत.

४. शासकीय सुटीचे दिवस वगळून शासकीय वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज या कार्यालयात प्रत्यक्ष (स्वत:) व्यक्तिश: सादर करणे आवश्यक.

५. मुलाखतीसाठी उमेदवारांना वेगळे पत्र पाठवले जाणार नाही.

६. मुलाखतीचा दिनांक व वेळ :- दि. १९/०५/२०२५ सकाळी १०:०० कागदपत्र पडताळणी करीता वेळेत उपस्थित राहावे, ११:०० ते २:०० पर्यंत मुलाखत होईल.

७. मुलाखतीचे ठिकाण :- मा. अधिष्ठाता कक्ष, शा.वै.म.अमरावती डफरिन हॉस्पीटल परिसर, श्रीकृष्णपेठ, अमरावती.

८. मुलाखतीच्या वेळेस मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

९.मुलाखती करीता उपस्थित राहण्याकरीता कोणत्याही प्रकारचे दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

१०.उमेदवाराने कुठलाही प्रकारे शिफारस पत्र जोडू नये किंवा इतर माध्यमातून शिफारस केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

११.उमेदवाराने स्वत: भरलेला अर्ज योग्य कागदपत्रे जोडून व्यक्तिश: विहीत वेळेत सादर करणे आवश्यक आहे. इतर कुठल्याही पध्दतीने सादर केलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**टिप:- जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पूर्णतः रद्द करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.**

(डॉ. किशोर इंगोले)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अमरावती

**अ) शैक्षणिक व इतर अर्हता :-** सहाय्यक प्राध्यापक, पदासाठी -महाराष्ट्र आर्युविज्ञान परिषद व राष्ट्रीय आर्युविज्ञान आयोगाने वेळोवेळी विहीत केलेली अर्हता-

(१) एम.डी/एम.एस/डि.एन.बी. संबंधित विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.
(२) बंधपत्रित उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
(३) वरिष्ठ निवासी पदाचा एक वर्षाचा अनुभव बंधणकारक
(४) राष्ट्रीय आर्युविज्ञान आयोग (NMC) यांच्या मानकानुसार शैक्षणिक व अनुभवाची पात्रता पूर्ण करीत असलेले उमेदवार.
(५) एन.एम.सी. वैद्य रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या/झाल्याचे नोंदीसह)

**(ब) वयोमर्यादा :-** खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४५ वर्ष राहील.

**(क) वेतन-** एकत्रीत मानधन तत्वावर.

**(ड) अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे (व्दिप्रतीत):-**

१. अर्ज योग्य तऱ्हेने खोडतोड न करतां सुस्वच्छ अक्षरात परिपूर्ण भरुन पुढील कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांप्रतीसह व्यक्तीश: सादर करणे आवश्यक आहे.
२. प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र.
३. पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र, Attempt certificate, जात व जात वैधता प्रमाणपत्र (लागु असल्यास),अधिवास (Domicile) प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र. BCBR असल्यास त्याचे प्रमाणपत्र
४. एन.एम.सी/एम.सी.आय. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण नोंदीसह.
५. या संस्थेत कार्यरत अध्यापकांनी संपुर्ण कागदपत्रे/प्रमाणपत्रे नव्याने सादर करावे कोणत्याही परिस्थितीत त्यांचे संस्थेत जमा असलेले प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती काढण्यासाठी त्यांना दिले जाणार नाही.
६.उमेदवार अन्य संस्थेत कार्यरत असल्यास अर्जा सोबत संबंधित संस्थाप्रमुखाचे ना हरकत प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील.

**इ) जाहिरातीमधील मजकुरात बदल करण्याबाबत :-**

१) या जाहिरातीमधील कोण्त्याही मजकुरात उदा. अटी/नियम/शर्ती/पदसंख्या इत्यादी मध्ये कोणताही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे या बाबतचे अंतिम निर्णय/अधिकार संस्था प्रमुख अधिष्ठाता शा.वै.महा.अमरावती, यांना असतील.
२) सदर विषयातील सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील पदे विहीत मार्गाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत ( MPSC )/निवड मंडळामार्फत तथा विनंती बदलीने उपलब्ध झाल्यास कंत्राटी/तातपुरत्या स्वरुपात निवड झालेल्या उमेदवाराची सेवा तात्काळ संपुष्टात येईल.

टिप :-

१.जाहिरातीतील नमुद पदे ही ३६४ दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येत आहे. सदर जागे/पदाकरीता उमेदवारास कुठल्याही दावा करण्याचे अधिकार नसतील.
२. ज्या उमेदवारांना संचालनालयाकडून मध्यवर्ती निवड प्रक्रियेव्दारे या पुर्वी सहाय्यक प्राध्यापक, या पदाकरिता शिफारस / निवड करण्यात आली आहे असे उमेदवार या मुलाखतीस पात्र राहणार नाही.
३. सहाय्यक प्राध्यापक या पदाकरीता शासकीय निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.
४. ज्या उमेदवारांनी या जाहिरातीपूर्वी अर्ज सादर केलेले असतील, त्यांनी सदर जाहिरातीनुसार पुनश्च अर्ज सादर करणे आवश्यक आहे. रिक्त पदांची संख्या कमी अथवा जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता सर्व अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांनी राखुन ठेवले आहेत.

**सर्वसाधारण अटी**

१. वरील दर्शविलेल्या पदसंख्येत बदल कमी/जास्त होऊ शकतो.

२. वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्य शासनाचा कर्मचारी म्हणता येणार नाही.

३. एमएससीआयटी परीक्षा पास असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (वैद्य शैक्षणिक अर्हता समाविष्ठ करुन)

४. उमेदवारांना मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

५. प्रशासकीय किंवा काही कारणास्तव निवड (भरती प्रक्रिया) कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांना आहे.

६. निवड झालेले उमेदवार निव्वळ तात्पुरत्या कंत्राटी (करार) स्वरुपातील असल्याने ते कधीही व केव्हाही कमी करण्यात येतील, त्यावर त्यांना कोणत्याही कायम स्वरुपाचा हक्क सांगता येणार नाही.

७. नियुक्ती झाल्यानंतर सेवा सुरु झाल्यानंतर कोणत्याही क्षणी कोणत्याही सबबी शिवाय कोणत्याही उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांनी राखुन ठेवले आहे.

८. अर्जासोबत पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्रे (प्रथम/व्दितीय/तृतीय यांची गुणपत्रिका, पासींग सर्टीफिकेट, डिग्री-अत्यावश्यक, इतर कागदपत्रे तसेच अनुभव प्रमाणपत्र व पासपोर्ट साईज फोटो व ओळखपत्र (टी.सी/आधारकार्ड/पॅनकार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट या पैकी कोणतेही दोन) जोडण्यात यावे. उपरोक्त कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात, (उपरोक्त सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील)

९. मुलाखतीच्या वेळी मुळ कागदपत्रे सोबत ठेवावी. मुळ प्रमाणपत्रे सादर न करणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. व ते प्रक्रियेतुन बाद समझले जाईल.

१०. इतर संस्थेतील कार्यरत उमेदवारानी अर्जासोबत संबंधित संस्था प्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे.

११. उमेदवाराने धारण केलेल्या पदाचा राजीनामा दयावयाचा झाल्यास एक महिना पुर्वसुचना देणे आवश्यक आहे. अन्यथा नोटीस न देता सहायक प्राध्यापक यांनी पदाचा राजीनामा दिल्यास त्यांला एक महिन्याचे वेतन/मानधन शासन तिजोरीत जमा करावे लागेल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२. वरील निवड झालेल्या उमेदवाराने विहित केलेल्या वेळेत कर्तव्यावर उपस्थित राहणे बंधणकारक राहील. तसेच कर्तव्याच्या ठिकाणी कामचुकारपणा, कुठलेही गैरवर्तन आढळल्यास सदर उमेदवाराची सेवा तात्काळ रद्द करण्यात येईल.

१३. जाहीरात दिलेल्या जागा तात्पुरत्या/कंत्राटी स्वरुपाच्या असुन कोणतीही पुर्व सुचना व कोणतेही कारण न दर्शविता सेवा तात्काळ समाप्त करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांना असतील.

**मुलाखत :-**

१. प्रत्यक्ष मुलाखत दि.१९/०५/२०२५ रोजी रिर्पोटिंगची वेळ सकाळी १०:०० वाजता व मुलाखत ११:०० ते २:०० पर्यत.

२. **मुलाखतीचे ठिकाण: मा. अधिष्ठाता कक्ष, प्रशासकीय इमारत, डफरीन हॉस्पीटल परिसर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.**

३. मुलाखतीस स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. अद्यावत माहीती करीता उमेदवार यांनी वेळोवेळी महाविद्यालयीन संकेत स्थळाला भेट घ्यावी.

४. मुलाखतीस उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित राहावे.

५. नियुक्तीनंतर मा.अधिष्ठाता यांच्या आदेशानुसार दिलेल्या ठिकाणी /विभागात कार्य करणे बंधनकारक राहील.

**निवडीचे निकष पुढील प्रमाणे राहील. (प्राधान्यक्रम) प्रचलीत शासन नियमानुसार**

(अ) नियमानुसार बंध प्रत्रीत उमेदवारास प्रथम प्राध्यान्य दिल्या जाईल.

(ब) पात्र उमेदवाराची यादी ही पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल.

(क) Valid MMC Registration असणे आवश्यक

(ड) अनुभवी उमेदवांराना प्राध्यान्य दिल्या जाईल.

टिप :- सदर जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पूर्णतः रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

For

(डॉ. किशोर इंगोले),
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अमरावती.

प्रति –

१. कार्यालयीन संकेतस्थळ, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
२. सूचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.

प्रत माहितीस्तव

१. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग, मुंबई.
२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य यांना सूचना फलकावर लावण्याकरीता सस्नेह सादर.

# थेट मुलाखतीने सहाय्यक प्राध्यापक (कंत्राटी) पदाकरीता अर्ज

| अर्जदाराने स्वत: चा फोटो साक्षांकित करुन येथे लावणे आवश्यक आहे. |
|---|

**प्रति,**
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अमरावती.

**विषय : सहायक प्राध्यापक..........................................................विषयातील ३६४ दिवसांकरीता थेट मुलाखत कंत्राटी पध्दतीच्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील पदासाठी अर्ज सादर करण्याबाबत....**

१) **उमेदवाराचे संपूर्ण नाव** :-...........................................................................................................

२) उमेदवाराचा कायमचा पत्ता :-...........................................................................................................
...........................................................................................................

३) शैक्षणिक अर्हता : पदवी/पदव्युत्तर पदवी (MBBS/MD/MS/DNB) पास केल्याचे दिनांक :- ........................................

४) पदवी/पदव्युत्तर पदवी (MBBS/MD/MS/DNB) उत्तीर्ण केलेल्या विद्यापीठाचे नाव :- ...............................................

५) सहायक प्राध्यापक या पदाकरिता जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव बंधनकारक राहील. (त्याबाबतचे आवश्यक कागदपत्रे सोबत जोडण्यात यावे ):- ...................................................................

६) जन्मदिनांक (अंकात) :- ............................अक्षरात :- ...............................................................

७) अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक १७/०५/२०२५ रोजीचे वय...... वर्ष............. महिना........ दिवस.....

८) आधार कार्ड क्रमांक :-....................................................... जात प्रर्वग:-...............................

९) मोबाईल क्रमांक :-..................................... ई-मेल आयडी :-........................................................

१०) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता :-

| **शैक्षणिक अर्हता** | **विद्यापीठाचे नाव** | **उत्तीर्ण वर्ष** | **एकुण गुण** | **प्राप्त गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) शासकीय नोकरीतुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांनी त्याबाबतची माहिती खालील तक्त्यात सादर करावी. तसेच अनुभव प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

| अ.क्र. | शासकीय संस्थेचे नाव | पदनाम | अनुभव | सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२) इतर अध्यापक/उमेदवार यांनी संबंधित पदाबाबतचा स्वत:चा अनुभवाचा तपशिल खालीलप्रमाणे देण्यात यावा. (सोबत प्रमाणपत्र जोडावे)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पद | रुजु झाल्याचा दिनांक | एकुण अनुभव | कामाचे स्वरुप (नियमीत/तात्पुरते) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१३) अभ्यासक्रमाचे नाव (Basic Course) सोबत प्रमाणपत्र जोडावे :-

I) मेडीकल एज्युकेशन टेक्नॉलॉजी - होय/नाही II) बायोमेडीकल रिसर्च - होय/नाही

१४) शोधनिबंधाबाबत माहिती जाहिरातीप्रमाणे (एनएमसी च्या मानकानुसार) (शोधनिबंधाच्या प्रती जोडने आवश्यक आहे)

| No | Publication type National/International | Publication year and publication No | Author type | Article index Yes/No | If indexed which index | Post Held |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

१५) अर्जा सोबत जोडलेले प्रमाणपत्रे

| अ.क्र. | प्रमाणपत्रे | अ.क्र. | प्रमाणपत्रे | अ.क्र. | प्रमाणपत्रे |
|---|---|---|---|---|---|
| १ | | ७ | | १३ | |
| २ | | ८ | | १४ | |
| ३ | | ९ | | १५ | |
| ४ | | १० | | १६ | |
| ५ | | ११ | | १७ | |
| ६ | | १२ | | १८ | |

DECLATATION (प्रतिज्ञापत्र)

सहाय्यक प्राध्यापक पदाकरीता

मी डॉ........................................................................... प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहिती प्रमाणे सत्य व अचूक आहे. मी प्रमाणित करतो/करते की, अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास अर्ज अपात्र करणेस, नोकरी ग़मविण्यास व त्या अनुषगांने होणाऱ्या कारवाईस पात्र राहिल. तसेच सदर पदावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील निव्वळ करार तत्वावर असल्याने शासन सेवेत कायम करण्यासाठी हक्क राहणार नाही, याची मला पुर्णपणे जाणीव असुन शासन सेवेत कायम करण्यासाठी भविष्यात हक्क सांगणार नाही, अशी लेखी हमी देत आहे.

स्थळ :-

अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :-

(अर्जदाराचे संपूर्ण नाव ................................................)

अर्जासोबत जोडावयाच्या आवश्यक कागदपत्राची सूची.

| क्र | आवश्यक कागदपत्राची सूची | सोबत जोडले आहे | सोबत जोडले नाही |
|---|---|---|---|
| १ | एमबीबीएस पदवी गुणपत्रीका ( पूर्ण वर्षाची ) | | |
| २ | एमबीबीएस पदवी प्रयत्न (Attempt) प्रमाणपत्र | | |
| ३ | एमबीबीएस पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र | | |
| ४ | एमबीबीएस MMC/MCI Registration and Renewal Certificate | | |
| ५ | एमबीबीएस पदवी प्रमाणपत्र | | |
| ६ | पदव्युत्तर पदवी गुणपत्रीका | | |
| ७ | पदव्युत्तर पदवी प्रयत्न (Attempt) प्रमाणपत्र | | |
| ८ | (१) पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र / Provisional MD Passing | | |
| ९ | पदव्युत्तर पदवी MMC/MCI Registration and Renewal Certificate | | |
| १० | पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र/ | | |
| ११ | वरिष्ठ निवासी पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र (एक वर्ष ) (One year SR Ship) | | |
| १२ | अभ्यासक्रमाचे नाव (Basic Course) सोबत प्रमाणपत्र जाडावे | | |
| | मेडीकल ऐज्युकेशन टेक्नोलॉजी - होय/नाही | | |
| | बायोमेडीकल रीसर्च - होय/नाही | | |
| १३ | अनुभव प्रमाणपत्र (जाहीराती प्रमाणे) | | |
| १४ | वयाचा पुरावा (जन्मदाखला, शाळा सोडल्याचा दाखला, दहावी प्रमाणपत्र) इ. | | |
| १५ | जात प्रमाणपत्र | | |
| १६ | जातवैधता प्रमाणपत्र | | |
| १७ | वैध नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र दि. ३१/०३/२०२६ पर्यंत वैद्य | | |
| १८ | अधिवास प्रमाणपत्र (Domicile) | | |
| १९ | आधार कार्ड | | |
| २० | पॅन कार्ड | | |
| २१ | बंधपत्रीत उमेदवार होय / नाही | | |
| २२ | इतर | | |

( टिप : उपरोक्त नमुद केलेल अ. १ ते २२ चे सर्व कागदपत्रे (दस्तऐवज)सांक्षाकित करुन वरिल अनुक्रमाणे व्दिप्रतीत अर्जासोबत जोडण्यात येत आहे )

उमेदवाराची स्वाक्षरी